D:\Old_ E Drive_06.12.2017\Naghate_02.05.2017\F C A 1980 All File & Folder\Nandgaon to Karwar National Highway\Proposal letter.docx


**उपवनसंरक्षक, अमरावती वनविभाग, अमरावती यांचे कार्यालय**

**कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२**

कार्यालयीन दूरध्वणी २६६२८१४ / २६६२४८०. २५१०१४४ (वैयक्तिक), फॅक्स- २६६२८१४

वनसंपर्क दुरध्वणी (नि:शुल्क) १५५३१४ (फक्त लॅंड लाईन वरुण संपर्कासाठी)

ई-मेल-पत्ता- dcfamtdn१४@gmail.com


**विषय :-** नांदगाव पेठ ते वरुड - पांढुर्णा राज्य महा मार्गाचे रुदिकरणा चा वनसंवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्ताव सादर करणे बाबत.

**क्रमांक :-** सर्व्हे /व.सं.अ.१९८०/ 6862 /२०१७-१८.

**अमरावती,** दिनांक 12-1-18

**प्रति,**

**कार्यकारी अभियंता,**

राष्ट्रीय महामार्ग विभाग, **अकोला.**

**संदर्भ :- १.०** आपले कार्यालयीन पत्रा क्रमांक ८५५ / P०२ / १२०१७, दिनांक १६.०३.२०१७.

**२.०** या कार्यालयाचे पत्र क्रमांक सर्व्हे / प्रस्ताव / २३६ / २०१७-१८, दिनांक - ०४.०५..२०१७.

-o-o-o-o-o-

उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक १ अन्वये, अमरावती वनविभाग, अमरावती या विभागाचे कार्यक्षेत्रातील अमरावती, मोर्शी व वरुड परिक्षेत्रा अंतर्गत अस्तित्वात असलेल्या रस्त्याचे नुतनीकरण तथा दर्जावाढ करणे करीता आपणाकडून वनसंवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत जमिन मागणीचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला होता. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भिय पत्रा क्रमांक २ अन्वये त्रुटि काढण्यात आलेल्या होत्या. परंतु त्याची पुर्तता अद्यापपर्यंत पुर्ण करण्यात आलेल्या नाही. सदर प्रस्तावामध्ये नमुद करण्यात आलेल्या क्षेत्राची प्राथमिक पहाणी तथा मोजणी करण्यात आली असून यामध्ये वनविभागाचे वनक्षेत्र बाधित होत आहे.

महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक एफएलडी-१००१/ प्रक्र ९ /फ-१०, दिनांक ०७ फेब्रूवारी २००१ तथा एफएलडी-३१०२/ प्रक्र ९ /फ-१०, दिनांक २४ जून २००३ (सोबत जोडण्यात येत आहे.) अन्वये निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सुचना **मुद्या क्र. १** अन्वये, सदर रस्त्याचे अस्तित्वात असलेल्या रुंदिमध्ये दुरूस्ती / मजबुतीकरण किंवा डांबरीकरण करण्याकरीता वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत केंद्र शासनाच्या पुर्व परवानगीची गरज लागणार नाही. वनक्षेत्रामध्ये अस्तित्वात असलेल्या रोडची दुरुस्ती सदर रस्त्याच्या रुंदिच्या मर्यादेमध्ये राहून दुरूस्तीची कामे करण्यास वन विभागाची हरकत राहणार नाही. दुरूस्तीची कामे करण्याकरीता लागणारे साहित्य हे वनक्षेत्राच्या बाहेरून आणावे लागेल. सदर रस्त्याच्या कडेला असलेले चर खोल खणून त्यातुन काढलेले साहित्य दुरुस्तीकरीता वापरावे. सदर रस्त्याचे काम करण्याकरीता मुरूम, गिट्टी व इतर साहित्य वनक्षेत्राच्या बाहेरून आणावे लागेल. मात्र रस्त्याच्या अंदाज पत्रका प्रमाणे जी गटारे खोदण्यात येणार आहेत त्याची माती मुरूम दुरूस्ती करीता वापरता येईल. **दुरूस्तीसाठी / मजबुतीकरण / डांबरीकरण करण्यासाठी कोणत्याही झाडाची तोड करता येणार नाही.** वनक्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या कडेच्या चरांच्या मर्यादेच्या बाहेर बॉरो पिटस् खणण्याचे काम करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.



Scanned by CamScanner

D:\Old_ E Drive_06.12.2017\Naghate_02.05.2017\F C A 1980 All File & Folder\Nandgaon to Karwar National Highway\Proposal letter.docx

वरिल पॅरामध्ये नमुद जरी अस्तित्वात असलेल्या रस्त्याची रुंदि ३० मीटर असेल, तरी आपण मागणी केलेल्या वनक्षेत्रावर वृक्षतोड करणे आवश्यक असल्यामुळे सदर प्रस्तावास वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत केंद्र शासनाच्या पुर्व परवानगीची गरज आहे. त्यामुळे आपण तशी परवानगी घेणे आवश्यक होते. परंतु दरम्यानच्या कालावधीमध्ये आपणाकडून पुर्व परवानगी न घेता वनविभागाचे क्षेत्रावर रोडच्या कामास सुरूवात करण्यात आलेली आहे. सदर काम बंद करण्याच्या सुचणा या कार्यालयाचे अधिनस्त असलेले वनपरिक्षेत्र अधिकारी, वरुड यांनी आपणास दिलेल्या आहेत. पुर्व परवानगी न घेता वनविभागाचे क्षेत्रावर अंशत: खोदकाम झाल्याचे तसेच वृक्षतोड केल्याचे दिसुन येते. आपण सादर केलेल्या प्रस्तावाची या कार्यालयाव्दारे तपासणी केली असता, हा प्रस्ताव नव्याने अस्तित्वात असलेल्या चेकलिस्ट प्रमाणे (सोबत जोडण्यात येत आहे.) परिपुर्ण नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे आपण सादर केलेला प्रस्ताव (४ प्रतित) आपणाकडे परत करण्यात येत असुन, यासोबत जोडण्यात आलेल्या चेकलिस्ट प्रमाणे सुधारीत प्रस्ताव वनभंगाचे विहीत प्रपत्रासह पुन्हा या कार्यालयाकडे सादर करावा. जेणे करून प्रस्तावा बाबत या विभागाकडून पुढील कारवाही करणे सोईचे होईल.

करीता माहीती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषीत.

**सहपत्र :-** वरिल प्रमाणे.

O/C

**उपवनसंरक्षक,**
अमरावती वन विभाग,
**अमरावती.**

**प्रतिलीपी :-** सहाय्यक वनसंरक्षक (कॅम्पा व वन्यजीव), विभागीय कार्यालय, अमरावती यांना वरिल प्रमाणे माहीतीस अग्रेषीत.

**प्रतिलीपी :-** वनपरिक्षेत्र अधिकारी, वरूड यांना वरिल प्रमाणे माहीतीस तथा पुढील कार्यवाहीस रवाना.

Scanned by CamScanner